# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Washim Rural**

**Date of Good Work done** :- **08/06/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन वाशीम ग्रामीण हद्दीतील वेगवेगळ्या 05 ठिकाणी चोरी करणाऱ्या टोळीस पोलिसांनी केले शिताफीने गजाआड ; लाखांचा मुद्देमाल जप्त.

# चोरी करणारी टोळी गजाआड

## 5 चोरीचे गुन्हे उघड करुन मुद्देमाल जप्त

**पब्लिक पोस्ट प्रतिनिधी**

**वाशिम** : ग्रामीण स्टेशन वाशिम हददीतील ग्राम नागटाणा येथे वेगवेगळ्या ठिकाणा वरुन अज्ञात आरोपीतांनी चोरी करुन एकुण 10,1000 / - रुपयांचा माल चोरुन नेल्या प्रकरणी ग्रामीण पोलीस स्टेशन वाशिम येथे फिर्यादी यांचे प्राप्त तक्रारी नुसार 1 अप क्र . 238/22 क . 461380 भादंवी , 2. 240/22 क . 379 34 भादंवी 3. 241/22 क . 379 भादंवी अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते . फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्याद प्रमाणे गुन्हे दाखल होताच पोलीस स्टेशन वाशिम ग्रामिण चे ठाणेदार महक स्वामी परिक्षाधीन IPS यांनी वेळीच दखल घेवून गोपनिय बातमीदार नेण्यात आले . गोपनिय बातमीदाराचे प्राप्त माहीती नुसार पोलीस पथक आरोपी शोध कामी रवाना करण्यात आले . पोलीस पथकाने नमुद गुन्हयातील आरोपीचा अत्यंत शिताफीने शोध घेवुन उमेश सुरेश उचित वय 24 वर्ष रा . नागठाणा यास ताब्यात घेण्यात आले . त्याने गुन्हयाची कबुली दिल्याने गुन्हयात अटक करण्यात आली . त्याचे कडुन पोलीस स्टेशन वाशिम ग्रामिण हददीतील ग्राम नागठाणा येथील दाखल वेगवेगळया 5 गुन्हे उघडकीस आणुन नमुद गुन्हयात चोरी गेलेला संपुर्ण मुदेमाल 1 ) कामेट कंपनीचे इंजीन किं अंदाज 15000 / - 2 ) 12 स्प्रिकंलर तोटया कि अंदाजे - 12000 / - 3 ) एक सोनी कंपनीचा



एलईडी टिव्ही- 40000 / - 4 ) एक वरपुल कंपनीचा फ्रिज किं अं 15000 / - 5 ) एक स्पर्म वार्मर मशीन किं अं . 4000 / - 5 ) लक्ष्मी कंपनीची मोटार 3 एचपी किं अं 15000 / - रु असा एकुण किं . 101000 / - रु चा जप्त करण्यात आला . अटक करण्यात आलेला आरोपी नामे उमेश सुरेश उचित वय 24 वर्ष रा . नागठाणा याचे साथीदार नामे संदीप यशवंता धाबे वय 36 वर्ष व किसन विटटलराव भालेराव वय 28 वर्ष दोन्ही रा . नागठाणा यांची नांवे निष्पन्न करुन त्यांचा तपास पथकाच मार्फतीने शोध घेण्यात आला . त्यांना ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे . तसेच अटक करण्यात आलेल्या आरोपीतांवर वाशिम जिल्हयात किंवा इतर जिल्हयात दाखल आहेत का याची खात्री करुन पुढील तपास करण्यात येत आहे .